श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

उद्धव गीता प्रथम सोपान (11.8)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।

देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।

प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

एकादशः स्कंधः

अथाष्टमोऽध्यायः

ब्राह्मण उवाच

सुखमैन्द्रियकं(म्) राजन्, स्वर्गे नरक एव च ।

देहिनां(यँ) यद् यथा दुःखं(न्), तस्मान्नेच्छेत तद् बुधः ॥ 1 ॥

अवधूत म्हणतात- हे राजन्! प्राण्यांना इंद्रियांचे दुःख जसे स्वर्गात व नरकातही मिळते, त्याचप्रमाणे सुखही मिळते. म्हणून बुद्धिमान माणसाने त्याची इच्छा धरू नये. (१)

ग्रासं(म्) सुमृष्टं(वँ) विरसं(म्), महान्तं(म्) स्तोकमेव वा ।

यदृच्छयैवापतितं(ङ्), ग्रसेदाजगरोऽक्रियः ॥ 2 ॥

प्रयत्न न करता योगायोगाने जे अन्न मिळेल, ते खाऊनच योग्याने अजगराप्रमाणे जीवन-निर्वाह करावा. मग ते चविष्ट असो की बेचव, अधिक असो की कमी. (२)

शयीताहानि भूरीणि, निराहारोऽनुपक्रमः ।

यदि नोपनमेद् ग्रासो, महाहिरिव दिष्टभुक् ॥ 3।।

पुष्कळ दिवस भोजन मिळाले नाही, तरीसुद्धा त्यासाठी प्रयत्न न करता तो प्रारब्धाचा भाग समजून अजगराप्रमाणे पडून राहावे. 3

ओजः(स्) सहोबलयुतं(म्), बिभ्रद् देहमकर्मकम् ।

शयानो वीतनिद्रश्च, नेहेतेन्द्रियवानपि ॥ 4 ॥

मनाचे बळ, इंद्रियांचे बळ व शारीरिक बळ या तिन्ही शक्तींनी युक्त असूनही तसेच इंद्रियांमध्ये कार्य करण्याची शक्ती असूनही देहाने काम न करता झोपल्यासारखे पडून राहावे, परंतु सजग असावे. (अजगरापासून, सुखासाठी प्रयत्न न करणे, मिळेल ते खाणे, दैवावर विसंबून राहणे, हे गुण घ्यावेत.) (४)

मुनिः(फ्) प्रसन्नगम्भीरो, दुर्विगाह्यो दुरत्ययः ।

अनन्तपारो ह्यक्षोभ्यः(स्), स्तिमितोद इवार्णवः ॥ 5 ॥

निश्चल समुद्र बाहेर प्रसन्न आणि आत गंभीर असतो. तो अथांग असतो. तो ओलांडता येत नाही. त्याचा अंत लागणे कठीण आहे. त्याला प्रक्षुब्ध करता येत नाही. त्याचप्रमाणे मुनी बाहेरून प्रसन्न पण आतून गंभीर असतो. तो कसा आहे, हे कोणाला कळत नाही. तेजामुळे कोणाला त्याच्यावर मात करता येत नाही. त्याचा अंतपार कोणाला लागत नाही आणि विकारांनी तो विचलित होत नाही. (५)

समृद्धकामो हीनो वा, नारायणपरो मुनिः ।

नोत्सर्पेत न शुष्येत, सरिद्भिरिव सागरः ॥ 6 ॥

समुद्राला नद्यांचे पाणी येऊन मिळाले, तरीसुद्धा तो वाढत नाही आणि नाही मिळाले, तरी तो आटत नाही. त्याचप्रमाणे भगवत्परायण मुनीसुद्धा समृद्धीने युक्त असला तरी आनंदाने हुरळून जात नाही आणि दारिद्र्य असले तरी दुःखी होत नाही. (समुद्रापासून धीरगंभीरता आणि सुखदुःखात एकरूपता हे गुण घ्यावेत.) (६)

दृष्ट्वा स्त्रियं(न्) देवमायां(न्), तद्भावैरजितेन्द्रियः ।

प्रलोभितः(फ्) पतत्यन्धे, तमस्यग्नौ पतं(ङ्)गवत् ॥ 7 ॥

ज्याप्रमाणे पतंग आगीच्या मोहात सापडून आगीवर झेप घेऊन मरतो, त्याचप्रमाणे इंद्रिये ताब्यात नसणारा मुनी देवमायारूपी स्त्रीला पाहून तिच्या विलासांना भुलून घोर नरकात पडतो. (७)

योषिद्धिरण्याभरणाम्बरादि-

द्रव्येषु मायारचितेषु मूढः ।

प्रलोभितात्मा ह्युपभोगबुद्ध्या,

पतं(ङ्)गवन्नश्यति नष्टदृष्टिः ॥ 8 ॥

स्त्री, सुवर्ण, अलंकार, वस्त्रे इत्यादी मायेने निर्माण केलेल्या पदार्थांमध्ये उपभोगबुद्धीने आसक्त झालेला मूर्ख मनुष्य आपला विवेक घालवून बसतो आणि त्या पतंगाप्रमाणे स्वतः त्यांमध्ये पडून आपला सर्वनाश करून घेतो. (मायानिर्मित पदार्थांमध्ये आसक्त होऊ नये, ही शिकवण पतंगापासून घ्यावी.) (८) ।

स्तोकं(म्) स्तोकं(ङ्) ग्रसेद् ग्रासं(न्), देहो वर्तेत यावता ।

गृहानहिं(म्)सन्नातिष्ठेद्, वृत्तिं(म्) माधुकरीं(म्) मुनिः ॥ 9 ॥

भ्रमर जसा अनेक फुलांमधील रस त्यांना पीडा न देता ग्रहण करतो, त्याचप्रमाणे मुनीने थोडे थोडे अन्न काही घरातून माधुकरी मागून आणावे. त्यायोगे शरीरनिर्वाही होईल आणि देणाऱ्यालाही कष्ट वाटणार नाहीत. (९)

अणुभ्यश्च महद्भ्यश्च, शास्त्रेभ्यः(ख्) कुशलो नरः ।

सर्वतः(स्) सारमादद्यात्, पुष्पेभ्य इव षट्पदः ॥ 10 ॥

भ्रमर जसा सर्व तऱ्हेच्या फुलांमधून रसरूप सार ग्रहण करतो, त्याप्रमाणे कुशल मुनीने सर्व लहान-मोठ्या शास्त्रांतून सार ग्रहण करावे. (१०)

सायन्तनं(म्) श्वस्तनं(वँ) वा, न सं(ङ्)गृह्णीत भिक्षितम् ।

पाणिपात्रोदरामत्रो, मक्षिकेव न सङ्ग्रही ॥ 11॥

सायन्तनं(म्) श्वस्तनं(वँ) वा, न सं(ङ्)गृह्णीत भिक्षुकः ।

मक्षिका इव सं(ङ्)गृह्णन्, सह तेन विनश्यति ॥ 12॥

मुनीने सायंकाळसाठी किंवा दुसऱ्या दिवसासाठी भिक्षान्न शिल्लक ठेवू नये. भिक्षा घेण्यासाठी पात्राऐवजी फक्त हात आणि ठेवण्यासाठी फक्त पोटच असावे. मधमाशीने मध साठवला तर मधासह तिचाही नाश होतो. म्हणून मुनीने कोणत्याही तऱ्हेचा संग्रह करू नये. (मधमाशीपासून पुढील गुण घ्यावेत. माधुकरी मागावी, शास्त्रांचे तात्पर्य घ्यावे. संग्रह करू नये.) (११-१२)

पदापि युवतीं(म्) भिक्षुर्न, स्पृशेद् दारवीमपि ।

स्पृशन् करीव बध्येत, करिण्या अं(ङ्)गसं(ङ्)गतः ॥ 13 ॥

मुनीने अगदी लाकडाच्या स्त्रीलासुद्धा कधीही पायानेही स्पर्श करू नये, नाहीतर लाकडी हत्तिणीमध्ये आसक्त झालेला हत्ती ज्याप्रकारे बांधला जातो, त्याचप्रमाणे हाही मोहात पडतो. (१३)

नाधिगच्छेत् स्त्रियं(म्) प्राज्ञ:(ख्), कर्हिचिन्मृत्युमात्मन: ।

बलाधिकै:(स्) स हन्येत, गजैरन्यैर्गजो यथा ॥ 14 ॥

आपला साक्षात मृत्यू अशा स्त्रीला विवेकी पुरुषाने कधीही जवळ करू नये. कारण हत्तिणीमध्ये आसक्त झालेला हत्ती दुसऱ्या बलवान हत्तीकडून मारला जातो, त्याचप्रमाणे हासुद्धा मृत्यूची शिकार होतो. (हत्तीपासून स्त्रीसंग वर्ज्य करावा, ही शिकवण घ्यावी.) (१४)

न देयं(न्) नोपभोग्यं(ञ्) च, लुब्धैर्यद् दु:खसं(ञ्)चितम् ।

भुङ्क्ते तदपि तच्चान्यो, मधुहेवार्थवित्मधु ॥ 15 ॥

लोभी मनुष्य कष्टाने साठवलेले धन कोणाला देत नाही की, स्वतः त्याचा उपभोग घेत नाही. त्याच्याकडील धनाची माहिती असणारा दुसराच कोणीतरी ते घेतो. जसे पोळ्यांतील मध काढणारा मनुष्य मधमाशांनी साठवलेला मध आपण घेतो. (१५)

सुदु:खोपार्जितैर्वित्तै- राशासानां(ङ्) गृहाशिष: ।

मधुहेवाग्रतो भुङ्क्ते, यतिर्वै गृहमेधिनाम् ॥ 16 ॥

ज्याप्रमाणे मधमाशांनी मोठ्या कष्टाने जमा केलेला मध त्यांच्या आधीच मध काढणारा मनुष्य खातो, त्याप्रमाणे गृहस्थांनी मोठ्या कष्टाने मिळविलेल्या पैशांतून तयार केलेले अन्नपदार्थ त्यांच्या आधीच संन्यासी उपभोगतो. (मध गोळा करणाऱ्याकडून मिळालेली शिकवण—धनासाठी कष्ट न करताही उदरनिर्वाह होऊ शकतो.) (१६)

ग्राम्यगीतं(न्) न शृणुयाद्, यतिर्वनचर:(ख्) क्वचित् ।

शिक्षेत हरिणाद् बद्धान्-मृगयोर्गीतमोहितात् ॥ 17 ॥

हरिणापासून मी हे शिकलो की, वनवासी संन्याशाने विषयांसंबंधीचे गाणे कधीही ऐकू नये. व्याधाच्या गीताने मोहित होऊन बांधल्या जाणाऱ्या हरिणाकडून हे शिकावे. (१७)

नृत्यवादित्रगीतानि, जुषन् ग्राम्याणि योषिताम् ।

आसां(ङ्) क्रीडनको वश्य, ऋष्यशृङ्गो मृगीसुत: ॥ 18॥

हरिणीपासून जन्मलेले ऋष्यशृंग मुनी स्त्रियांचे वैषयिक गाणे-बजावणे, नाचणे इत्यादी पाहून, ऐकून त्यांना वश झाले आणि शेवटी त्यांच्या हातातील बाहुले बनले. (वैषयिक गीते ऐकू नयेत, ही शिकवण हरिणापासून घ्यावी.) (१८)

जिह्वयातिप्रमाथिन्या, जनो रसविमोहित: ।

मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्-मीनस्तु बडिशैर्यथा ॥ 19॥

मासा जसा गळाला लावलेल्या मांसाच्या तुकड्याच्या लोभाने आपले प्राण गमावतो, त्याचप्रमाणे चवदार पदार्थांचा लोभी निर्बुद्ध माणूससुद्धा मनाला व्याकूळ करणाऱ्या आपल्या जिभेला वश होऊन मारला जातो. (१९)

इन्द्रियाणि जयन्त्याशु, निराहारा मनीषिणः ।

वर्जयित्वा तु रसनं(न्), तन्निरन्नस्य वर्धते ॥ 20 ॥

विवेकी लोक जेवण घेण्याचे बंद करून इतर इंद्रियांवर लवकर विजय मिळवितात; परंतु यामुळे जीभ ताब्यात येत नाही. उलट भोजन घेणे बंद केल्यामुळे ती अधिकच खवळते. (२०)

तावज्जितेन्द्रियो न स्याद्, विजितान्येन्द्रियः(फ्) पुमान् ।

न जयेद् रसनं(यँ) यावज्-जितं(म्) सर्वं(ञ्) जिते रसे ॥21 ॥

माणसाने सर्व इंद्रियांवर विजय मिळविला तरी जोपर्यंत तो जिभेला ताब्यात ठेवत नाही, तोपर्यंत जितेंद्रिय होऊ शकत नाही. कारण जीभ जिंकली तर सर्व इंद्रिये जिंकली, असे खुशाल समजावे. (जीभ जिंकणे महत्त्वाचे, हे माझ्यापासून शिकावे.) (२१)

पिंं(ङ्)गला नाम वेश्याऽऽसीद्, विदेहनगरे पुरा ।

तस्या मे शिक्षितं(ङ्) किं(ञ्)चिन्- निबोध नृपनन्दन ॥ 22 ॥

हे राजन्! पूर्वी एकदा विदेहनगरात पिंगला नावाची वेश्या राहत होती. मी तिच्याकडून जे शिकलो, ते तुला सांगतो. (२२)

सा स्वैरिण्येकदा कान्तं(म्), सं(ङ्)केत उपनेष्यती ।

अभूत् काले बहिर्द्वारि, बिभ्रती रूपमुत्तमम् ॥23 ॥

ती अतिशय सुंदर वेश्या एकदा रात्रीच्या वेळी एखाद्या पुरुषाला आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी नटून-थटून घराच्या बाहेरच्या दारात उभी राहिली. (२३)

मार्ग आगच्छतो वीक्ष्य, पुरुषान् पुरुषर्षभ ।

ताञ्छुल्कदान् वित्तवतः(ख्), कान्तान् मेनेऽर्थकामुका ॥ 24 ॥

हे पुरुषश्रेष्ठा! पैशाची लालसा असलेल्या तिला वाटेतून येणाऱ्या-जाणाऱ्या पुरुषांना पाहून, ते धनवान असून धन देऊन आपला प्रियकर होण्यासाठी येत आहेत, असे वाटे. (२४)

आगतेष्वपयातेषु, सा सं(ङ्)केतोपजीविनी ।

अन्यो वित्तवान् कोऽपि, मामुपैष्यति भूरिदः ॥ 25॥

अनेक पुरुष येऊन निघून गेले, तरी त्या वेळेला वाटे की, आणखी एखादा धनवान माणूस आपल्याकडे येईल व तो आपल्याला पुष्कळ धन देईल. (२५)

एवं(न्) दुराशया ध्वस्त- निद्रा द्वार्यवलम्बती ।

निर्गच्छन्ती प्रविशती, निशीथं(म्) समपद्यत ॥ 26 ॥

अशी खोटी आशा बाळगून झोपमोड झालेली ती दरवाजाजवळ ताटकळत उभी होती. ती कधी बाहेर येई तर कधी आत जाई. होता होता मध्यरात्र झाली. (२६)

तस्या वित्ताशया शुष्यद्- वक्त्राया दीनचेतसः ।

निर्वेदः(फ्) परमो जज्ञे, चिन्ताहेतुः(स्) सुखावहः ॥ 27 ॥

पैशाच्या आशेने चेहरा सुकून गेला. चित्त व्याकूळ झाले आणि तिच्या मनात तीव्र वैराग्य निर्माण झाले. तिच्या चिंतेचे कारणच तिच्या सुखाला कारणीभूत ठरले. (२७)

तस्या निर्विण्णचित्ताया, गीतं(म्) शृणु यथा मम ।

निर्वेद आशापाशानां(म्), पुरुषस्य यथा ह्यसिः ॥ 28॥

पिंगळेच्या चित्तामध्ये जेव्हा वैराग्य जागृत झाले, तेव्हा तिने गायिलेले गीत माझ्याकडून ऐक. "मनुष्याची आशारूपी दोरी तोडणारी तलवार म्हणजे वैराग्य." (२८)

न ह्यं(ङ्)गाज्जातनिर्वेदो, देहबन्धं(ञ्) जिहासति ।

यथा विज्ञानरहितो, मनुजो ममतां(न्) नृप ॥ 29॥

राजन्! जसा अज्ञानी माणूस ममता सोडू इच्छित नाही, त्याचप्रमाणे ज्याला वैराग्य प्राप्त झाले नाही, तो शरीर आणि त्याची बंधने तोडून टाकू इच्छित नाही. (२९)

पिं(ङ्)गलोवाच

अहो मे मोहविततिं(म्), पश्यताविजितात्मनः ।

या कान्तादसतः(ख्) कामं(ङ्), कामये येन बालिशा ॥30 ॥

पिंगला म्हणू लागली- अहो! इंद्रियांच्या अधीन झालेल्या माझा मूर्खपणा आणि मोहाची झेप तर पहा! जी मी क्षुद्र माणसांकडून विषयसुखाची इच्छा करीत आहे. (३०)

सन्तं(म्) समीपे रमणं(म्) रतिप्रदं(वँ्),

वित्तप्रदं(न्) नित्यमिमं(वँ्) विहाय ।

अकामदं(न्) दुःखभयाधिशोक-

मोहप्रदं(न्) तुच्छमहं(म्) भजेऽज्ञा ॥ 31 ॥

माझा खरा पती नेहमी माझ्याजवळच आहे. तोच मला परमानंद आणि परमार्थधन देणारा आहे. त्याला सोडून मी माझी एकही इच्छा पूर्ण करू शकत नाही, उलट जे मला दुःख, भय, आधिव्याधी, शोक आणि मोह देणारे आहेत, अशा क्षुद्र माणसांचे मी सेवन करीत राहिले. किती मी मूर्ख ! (३१) ।

अहो मयाऽऽत्मा परितापितो वृथा,

सां(ङ्)केत्यवृत्त्यातिविगर्ह्यवार्तया ।

स्त्रैणान्नराद् यार्थतृषोऽनुशोच्यात्,

क्रीतेन वित्तं(म्) रतिमात्मनेच्छती ॥ 32 ॥

अरेरे ! मी अत्यंत निंद्य अशा वेश्यावृत्तीचा आश्रय करून व्यर्थच माझ्या शरीराला आणि मनाला क्लेश दिले. स्त्रीलंपट, लोभी आणि निंद्य अशा लोकांना हे शरीर विकून मी धनाची आणि रतिसुखाची इच्छा करीत होते ! (३२)

यदस्थिभिर्निर्मितवं(म्)शवं(म्)श्य-

स्थूणं(न्) त्वचा रोमनखैः(फ्) पिनद्धम् ।

क्षरन्नवद्वारमगारमेतद्,

विण्मूत्रपूर्णं(म्) मदुपैति कान्या ॥ 33॥

जसे बांबूचे आडे, वासे, पट्ट्या इत्यादींनी घर बांधावे, त्याप्रमाणे पाठीचा कणा, हाडे इत्यादींनी हे शरीररूपी घर तयार झाले आहे. ते त्वचा, लव तसेच नखांनी आच्छादिले आहे. याच्या नऊ दरवाज्यांमधून सदैव मल-मूत्र इत्यादी वाहत असते. माझ्याखेरीज दुसरी अशी कोणती स्त्री असेल की, जी अशा या निंद्य शरीरालाच प्रिय समजून त्याचे सेवन करील? (३३)

विदेहानां(म्) पुरे ह्यस्मिन्- नहमेकैव मूढधीः ।

यान्यमिच्छन्त्यसत्यस्मा- दात्मदात् काममच्युतात् ॥ 34 ॥

या विदेही लोकांच्या - जीवनमुक्तांच्या नगरीत मी एकटीच मूर्ख आणि चारित्र्यहीन आहे. कारण जी स्वतःचे सुद्धा दान करणाऱ्या अविनाशी परमात्म्याला सोडून दुसऱ्या पुरुषाची अभिलाषा धरीत आहे. (३४)

सुहृत् प्रेष्ठतमो नाथ, आत्मा चायं(म्) शरीरिणाम् ।

तं(वँ) विक्रीयात्मनैवाहं(म्), रमेऽनेन यथा रमा ॥ 35॥

हे सर्व प्राण्यांचे आत्मा, त्यांचे हित करणारे, माझे प्रियतम स्वामी आहेत. आता मी स्वतःचीच किंमत देऊन यांना विकत घेईन आणि लक्ष्मीप्रमाणे यांच्याबरोबर विहार करीन. (३५)

कियत् प्रियं(न्) ते व्यभजन्, कामा ये कामदा नराः ।

आद्यन्तवन्तो भार्याया, देवा वा कालविद्रुताः ॥ 36 ॥

जितके म्हणून हे विषय किंवा ते देणारे जन्म-मृत्यू असणारे पुरुष आहेत, यांनी तुझे काय प्रिय केले आहे? किंवा काळाने कवटाळलेल्या देवांनी तरी आपल्या बायकांचे काय भले केले आहे? (३६)

नूनं(म्) मे भगवान् प्रीतो, विष्णुः(ख्) केनापि कर्मणा ।

निर्वेदोऽयं(न्) दुराशाया, यन्मे जातः(स्) सुखावहः ॥37 ॥

माझ्या कोणत्या तरी शुभकर्मामुळेच भगवान विष्णू निश्चितच माझ्यावर प्रसन्न झाले आहेत. म्हणून तर भलतीच आशा करणाऱ्या मला अशा प्रकारे वैराग्य आले. माझे हे वैराग्यच मला नक्की सुख देणारे ठरेल. (३७)

मैवं(म्) स्युर्मन्दभाग्यायाः(ख्), क्लेशा निर्वेदहेतवः ।

येनानुबन्धं(न्) निर्हृत्य, पुरुषः(श्) शममृच्छति ॥ 38॥

जर मी अभागिनी असते, तर मला झालेले दुःख हे माझ्या वैराग्याचे कारण ठरले नसते ! कारण अशा प्रकारच्या वैराग्यामुळेच मनुष्य आपले संसार-बंधन तोडून परमशांती मिळवितो. (३८)

तेनोपकृतमादाय, शिरसा ग्राम्यसं(ङ्)गताः ।

त्यक्त्वा दुराशाः(श्) शरणं(वँ), व्रजामि तमधीश्वरम् ॥ 39॥

आता मी भगवंतांचे हे उपकार मस्तकावर झेलून आणि विषयभोगांची वाईट इच्छा टाकून देऊन त्याच जगदीश्वरांना शरण जाते. (३९)

सन्तुष्टा श्रद्दधत्येत- द्यथालाभेन जीवती ।

विहराम्यमुनैवाह-मात्मना रमणेन वै ॥40 ॥

आता मला माझ्या प्रारब्धानुसार जे काही मिळेल, त्यावरच मी संतोष मानून श्रद्धापूर्वक जीवन व्यतीत करीन. तसेच आपले आत्मस्वरूप अशा या प्रियतम प्रभूच्या बरोबरच विहार करीन. (४०)

सं(म्)सारकूपे पतितं(वँ), विषयैर्मुषितेक्षणम् ।

ग्रस्तं(ङ्) कालाहिनाऽऽत्मानं(ङ्), कोऽन्यस्त्रातुमधीश्वरः ॥ 41 ॥

हा जीव संसाराच्या विहिरीत पडला आहे. विषयांनी याला अगदी आंधळे केले आहे. काळरूपी अजगराने याला आपल्या दाढेत पकडले आहे. आता याचे रक्षण करणारा भगवंताखेरीज दुसरा कोण आहे? (४१)

आत्मैव ह्यात्मनो गोप्ता, निर्विद्येत यदाखिलात् ।

अप्रमत्त इदं(म्) पश्येद्, ग्रस्तं(ङ्) कालाहिना जगत् ॥ 42 ॥

ज्यावेळी जीव सर्व विषयांपासून विरक्त होतो, त्यावेळी तो स्वतःच आपले रक्षण करतो. म्हणून हे सर्व जग काळरूपी अजगराने ग्रासले आहे, हे अत्यंत सावधानपूर्वक जाणले पाहिजे. (४२)

ब्राह्मण उवाच

एवं(वँ) व्यवसितमतिर्- दुराशां(ङ्) कान्ततर्षजाम् ।

छित्त्वोपशममास्थाय, शय्यामुपविवेश सा ॥ 43 ॥

अवधूत म्हणतात— असा निश्चय करून पिंगला वेश्येने आपल्या प्रिय धनवंतांची व्यर्थ आशा करणे सोडून देऊन ती आपल्या अंथरुणावर शांतपणे जाऊन झोपली. (४३)

आशा हि परमं(न्) दुःखं(न्), नैराश्यं(म्) परमं(म्) सुखम् ।

यथा सञ्छिद्य कान्ताशां(म्), सुखं(म्) सुष्वाप पिं(ङ्)गला ॥ 44 ॥

खरोखर आशा हेच सर्वांत मोठे दुःख आहे आणि निराशा हेच सर्वांत मोठे सुख आहे. पिंगला वेश्येने जेव्हा पुरुषांची आशा सोडली, तेव्हा ती सुखाने झोपू शकली. (विषयांची आशा करू नये, हे पिंगलेकडून शिकावे.) (४४)

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धेऽष्टमोऽध्यायः।।

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥